# प्रस्तावना

# "कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर : एक राजकीय व प्रशासकीय अभ्यास"

## प्रस्तावना

'कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर : एक राजकीय व प्रशासकीय अभ्यास' हा विषय शोधप्रबंधासाठी निवडला आहे. या विषयाची निवड करीत असताना काही उद्देश समोर ठेवून त्या दृष्टीने अभ्यासाची दिशा निश्चित केली आहे.

कृषि अर्थव्यवस्था ही आपल्या अर्थव्यवस्थेचे महत्वाचे अंग आहे. आपल्या देशातील मुख्य व्यवसाय शेती हा आहे. आज मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये मागणी व पुरवठा या बाबी बाजारपेठेचे स्वरूप ठरवतात. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ खुली झाल्यामुळे शेती व्यवसाय अधिक बाजाराभिमूख होत आहे. या सर्व परिस्थितीत शेतकऱ्याला त्याच्या उत्पादीत मालास विक्री प्रक्रियेत योग्य चालना मिळाली पाहिजे. भारतामध्ये बाजारनियंत्रणाचे कायदे पुर्वीपासून अस्तित्वात आहेत. त्यामध्ये परिस्थितीनुरुप योग्य ते बदल करणेत आले आहेत. या कायद्याचा उद्देश हा प्रामुख्याने शेतकऱ्यांचा माल योग्यरितीने विकला जावा, शेतकऱ्यांची फसवणूक होवू नये तसेच खरेदीदाराला एकत्रित माल मिळून सरस निरस प्रत ठरविणे सोयीचे व्हावे, चांगल्या दर्जाचे शेतीमालाचे उत्पादन होण्यास उत्तेजन मिळावे, शेतीमाल साठवणूकीची योग्य व्यवस्था व्हावी हा आहे. वरील उद्देशाच्या यशस्वीतेसाठी बाजार समित्यांची स्थापना केलेली आहे.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर मार्केट कायद्यांचे एकत्रिकरण करुन राज्यातील सर्व बाजार समितींना 'महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ व नियम, १९६७' हा कायदा लागू केला आहे. सध्या कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचे कामकाज या कायद्याप्रमाणे चालू आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासात सहकारी संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांचे योगदान महत्वाचे आहे. बाजारसमितीचे कार्य जिल्ह्याच्या आर्थिक विकासात आधारभूत ठरले

आहे. राजर्षि शाहू महाराजांनी स्थापन केलेली बाजारपेठ "गूळ बाजारपेठ" म्हणून प्रसिध्द आहे. बाजारसमितीने जिल्ह्याच्या कृषि औद्यागिक विकासाचे महत्वाचे कार्य केले आहे. शेतकऱ्यांचे व सर्व संबंधीत घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी विकासाचा एक मार्ग असलेल्या बाजार समितीचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. बाजार समितीचे संघटन व प्रशासन बाजारपेठेच्या विकासासाठी मोलाचे ठरले आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकीय विकासात बाजारसमितीने महत्वपूर्ण कार्य केले आहे. बाजारसमितीच्या प्रगतीत राजकीय नेतृत्वाचे योगदान महत्वपूर्ण ठरले आहे. जिल्ह्यातील राजकारणाशी बाजार समितीतील राजकारणाचा जवळचा संबंध आहे. जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्या राजकारणाची सुरुवात येथे केली आहे. तसेच अनेकांनी आपली राजकीय कारकीर्द बाजारसमितीत घालविली आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात बाजारसमितीच्या महत्वाच्या कार्याचा आढावा तसेच विकासातील मोलाची कामगिरी व राजकीय नेतृत्वाचे योगदान पहाणे तसेच बाजारसमितीच्या कार्याचे मूल्यमापन करून प्रगतीसाठी उपाययोजना सुचविणे या संदर्भात अभ्यास केलेला आहे.

शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये शेतीव्यवसाय, भारतातील व महाराष्ट्रातील बाजार नियंत्रणाची वाटचाल, त्याचबरोबर कोल्हापूर बाजार समितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी व परिचय यांचा अभ्यास केलेला आहे.

शोधप्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणामध्ये बाजारसमितीस लागू असलेला मार्केटचा कायदा, बाजार विकासासाठी कायद्यानुसार बाजार समितीचे केलेले संघटन, त्याचप्रमाणे बाजार समितीच्या योग्य नियमनासाठी कायद्याने निर्माण केलेली प्रशासकीय रचना यांचा विस्तृतपणे अभ्यास केलेला आहे.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचे आजपर्यंतचे कार्य शेतकरी, व्यापारी व कामगार यांचे हितसंवर्धनासाठी झाले आहे. बाजार समितीच्या विकासात शेतकरी, व्यापारी व कामगार यांचे योगदान महत्वपूर्ण मानले जाते. बाजारसमितीचे कार्य विभागनिहाय चालते. शेतकरी, व्यापारी व

कामगार यांच्या प्रगतीसाठी बाजारसमितीने केलेल्या कार्याचा आढावा शोधप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात अभ्यासलेला आहे.

बाजारसमितीचा राजकीय अभ्यास करताना बाजार समितीच्या निवडणूका आणि त्यासाठी होणारे राजकारण तसेच समितीच्या विकासात व योग्य वाटचालीत आजपर्यंतच्या राजकीय नेतृत्वाचे योगदान यांचा आढावा घेतला आहे. बाजार समितीच्या राजकारणाचा इतर राजकारणाशी असलेला संबंध, जिल्ह्यातील नेतेमंडळींचा सहभाग तसेच राजकीय नेतृत्व निर्मितीतील बजार समितीची कामगिरी याचा अभ्यास शोधप्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात केलेला आहे.

शोधप्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात बाजार समितीच्या कार्याचे मुल्यमापन वरील प्रकरणांच्या अनुषंगाने केले आहे. त्याचप्रमाणे बाजार समितीच्या भावी वाटचालीसाठी व योग्य प्रगतीसाठी सर्व संबंधीत घटकांशी चर्चा करून उपययोजना व शिफारशी सुचविलेल्या आहेत.

**शोधप्रबंध विषयाची व्याप्ती :**

शोधप्रबंधाच्या अभ्यासासाठी ''कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर'' या संस्थेची निवड केली आहे. यातूनच राजकीय व प्रशासकीय स्वरूपाचा अभ्यास करून निष्कर्ष मांडणार आहोत.

बाजार समितीचे कार्यक्षेत्र कोल्हापूर जिल्ह्यातील बारा तालुक्यांपैकी साडे सहा तालुके इतके आहे. समितीच्या कार्यक्षेत्रात एकूण ७१२ गांवे समाविष्ट आहेत. समितीची प्रमुख बाजारपेठ ''श्री शाहू मार्केट यार्ड, कोल्हापूर'' ही असून इतर उपबाजार आवार आहेत. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचे कामकाज महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ व नियम, १९६७ या कायद्यानुसार चालते. कायद्यानुसार संचालक मंडळाचे संघटन केले आहे व प्रशासकीय कामकाज सचिवांचे मार्गदर्शनाखाली चाललेले आहे. बाजार समितीचे प्रशासन कार्यक्षम होणेसाठी कामकाजाची विभागनिहाय रचना केली आहे. प्रशासकीय कामकाज सभापती व उपसभापती यांच्या नियंत्रणाखाली व देखरेखीखाली चालते. बाजार समितीचे कार्य शेतकरी, व्यापारी व कामगार यांच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे.

## शोधप्रबंधाच्या अभ्यासाचे उद्देश :

१) बाजार नियंत्रणाचा कायदा मुख्यत: शेतकऱ्यांच्या हितसंरक्षणासाठी तसेच सर्व संबंधीत घटकांच्या हितासाठी केला आहे. या कायद्याने बाजार समितीची वृध्दी आणि विकास होणेसाठी कितपत उपयोग झाला याचा शोध घेणे.

२) कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीचे संघटन व प्रशासन यांचा संबंध आणि या सर्व घटकांचा गतिमान प्रशासन होण्यातील सहभाग याचा शोध घेणे.

३) कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीत निवडणूकी वेळचे राजकारण, राजकीय नेतेमंडळींचा व राजकीय पक्षांचा सहभाग तसेच बाजार समितीतील सत्तासंपादनाचा इतर राजकारणावर होणारा परिणाम याचा आढावा घेऊन बाजार समितीच्या विकासातील राजकीय नेतृत्वाची मोलाची कामगिरी व योगदान तपासणे.

४) बाजार समिती ज्या उद्दिष्टांसाठी स्थापन झाली आहे त्या अनुषंगाने शेतकरी, व्यापारी व कामगार यांचे हितसंवर्धनासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

५) बाजार समितीच्या कार्याचे मूल्यमापन करणे व पुढील भक्कम वाटचालीसाटी सर्व संबंधीत घटकांशी चर्चा करुन उपाययोजना सुचविणे.

## अभ्यास पध्दती :

प्रस्तुत शोधप्रबंधाचा अभ्यास करणेसाठी ऐतिहासिक साहित्य, रौप्य महोत्सव ग्रंथ, समितीचे वार्षिक अहवाल, सर्वसाधारण माहिती पुस्तिका, पृष्ठाधार साहित्य, दैनिक पुढारी, दैनिक सकाळ, दैनिक तरूण भारत ही वर्तमानपत्रे यांचा उपयोग केला आहे. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ व नियम, १९६७ हा कायदा तसेच सभापती, उपसभापती, संचालक मंडळ, सचिव, अधिकारी व कर्मचारी वर्ग, शेतकरी, व्यापारी व कामगार अशा सर्व संबंधीत घटकांशी चर्चा करुन व मुलाखती घेवून माहिती मिळविली आहे.